MHKO100007752017

-

## रे.क.नं. १५७/२०१७ मधील निशाणी क्र. ३५ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २० चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २० अनिल सुरेश देसाई हे दिनांक २३/११/२०१६ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. प्रतिवादी हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर आणावे लागते याची माहिती वादी यांना नसलेने त्याबाबतची माहिती वकीलांना दिलेली नाही. वादी ही कन्नड भाषिक असून ती वयोवृध्द आहे. सदरचा वाद हा स्थावर मिळकतीद्दल असलेने प्रतिवादी क्र. २० चे वारस रेकॉर्डवर आणणे अत्यंत आवश्यक आहे. सबब वादी यांनी प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेची विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जास आपले म्हणणे दाखल करुन असे कळविले आहे की, प्रतिवादी क्र. २० हा दावा दाखल करणेपुर्वी मयत झाला आहे. त्यामुळे कायदयाप्रमाणे योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरचा दावा वाटपासाठी दाखल केला असल्यामुळे दाव्यात सर्व पक्षकार आवश्यक पक्षकार आहेत. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्याकरीता प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. सदरचे प्रकरण हे पाच वर्षपेक्षा जास्त जुने असलेने व न्यायाचा विलंब टाळण्याकरीता तसेच प्रतिवादी यांनी आपल्या म्हणण्यामध्ये विशेष विरोध दर्शविला नसल्यामुळे सदरचा अर्ज वादी यांचेवर खर्च बसवून मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**१) वादी यांचा निशाणी क्र. ३५ वरील अर्ज प्रतिवादी यांना रक्कम रुपये ३००/- खर्च देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.**

**२) सदरचे प्रकरण हे जुने असलेने वादी यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत जमा करावी. वादी यांनी सदरची रक्कम पुढील तारखेपर्यंत जमा न केलेस सदरचा आदेश आपोआप रद्दबातल समजणेत यावा.**

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.01.23 17:15:06 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक २३/०१/२०२३

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

MHKO100007752017

-

## रे.क.नं. १५७/२०१७ मधील निशाणी क्र. ३६ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २० विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी अनिल सुरेश देसाई हे दिनांक २३/११/२०१६ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. प्रतिवादी हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर आणावे लागते याची माहिती वादी यांना नसलेने त्याबाबतची माहिती वकीलांना दिलेली नाही. वादी ही कन्नड भाषिक असून ती वयोवृध्द आहे. तसेच दरम्यानच्या काळात कोवीड १९ चा प्रादुर्भाव वाढल्यामुळे सर्वत्र लॉकडाऊन होते. सबब वादी यांनी प्रतिवादी क्र. २० यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**४.** प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जास आपले म्हणणे दाखल करुन असे कळविले आहे की, प्रतिवादी क्र. २० हा दावा दाखल करणेपुर्वी मयत झाला आहे. त्यामुळे कायदयाप्रमाणे योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. वादीयांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. २० चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. २० चे वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादी यांचा निशाणी क्र. ३५ वरील विलंब माफ होवून मिळणेचा अर्ज त्यांचेवर खर्च बसवून मंजूर करणेत आला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटत आहेत. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**वादी यांचा निशाणी क्र. ३६ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.**

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.01.23 17:15:13 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक २३/०१/२०२३

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

MHKO100007752017

-

## <u>रे.क.नं. १५७/२०१७ मधील निशाणी क्र. ३७ वरील आदेश</u>

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २० अनिल सुरेश देसाई यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २० अनिल सुरेश देसाई हे दिनांक २३/११/२०१६ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद हेच सरळ व कायदेशिर वारस असून याशिवाय अन्य कोणीही वारस नाही.

**४.** प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन असे कळविले आहे की, वारसांची खात्री वादीनेच करावी.

**५.** वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. वादी यांचे निशाणी ३५ व ३६ वरील प्रतिवादी क्र. २० चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफीचा व अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेबाबतचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत . सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

**१)** वादी यांचा निशाणी क्र. ३७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी दाव्यात वादीच्या वारसाबाबत योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत सत्वर दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.01.23 17:15:20 +0530

ठिकाण – गडहिंग्लज　　(म. ता. खराडे)
दिनांक २३/०१/२०२३　　सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.गडहिंग्लज